कार्यालय पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, हिंगोली

दिनांक :— २८.१०.२०२१

## प्रेसनोट

**आरोपी लोकसेवक १)श्री संदीप तात्याराव पंडित, वय ३२ वर्षे, व्यवसाय नौकरी वनरक्षक, वर्ग—३, वनपरिक्षेत्र कार्यालय, वसमत २) प्रियंका पांडुरंग देवतकर, वय ३१ वर्षे, व्यवसाय नौकरी, वनपाल वर्ग—३, वनपरिक्षेत्र कार्यालय, वसमत यांचे विरूध्द ८,०००/— रू.च्या लाचेची मागणी करून सदर रक्कम आरोपी कमांक १ यांनी स्विकारल्या प्रकरणी गुन्हा दाखल व अटक.**

---

दि.२७.१०.२०२१ रोजी यातील तक्रारदार यांनी अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालय, हिंगोली येथे तक्रार दिली होती की, तक्रारदार यांना वनरक्षक संदीप पंडीत व वनपाल प्रियंका देवतकर हे लाकडांच्या वाहतुकी करीता प्रति टॅक्टर गाडी दोन हजार रूपये प्रमाणे चार गाडयांचे एकुण ८०००/—रू. लाचेची मागणी करीत आहे.

वगैरे मजकुराच्या तक्रारीवरून दि.२७.१०.२०२१ रोजी करण्यांत आलेल्या पडताळणी मध्ये यातील आलोसे क. १)श्री संदीप तात्याराव पंडित, वय ३२ वर्षे, व्यवसाय नौकरी वनरक्षक, वर्ग—३, वनपरिक्षेत्र कार्यालय, वसमत यांनी तक्रारदार यांचेकडे स्वतःकरीता व वनपाल श्रीमती प्रियंका देवतकर यांचेकरीता प्रतिगाडी दोन हजार रूपये प्रमाणे चार गाडयांचे एकुण ८,०००/—रू. लाचेची मागणी करून सदर लाचेची रक्कम आरोपी कमांक १ संदिप पंडीत यांनी स्वतः स्विकारली.

त्यावरून दि.२८.१०.२०२१ रोजी १)श्री संदीप तात्याराव पंडित, वय ३२ वर्षे, व्यवसाय नौकरी वनरक्षक, वर्ग—३, वनपरिक्षेत्र कार्यालय, वसमत २)प्रियंका पांडुरंग देवतकर, वय ३१ वर्षे, व्यवसाय नौकरी, वनपाल वर्ग—३, वनपरिक्षेत्र कार्यालय, वसमत यांचे विरूध्द पोलीय स्टेशन वसमत शहर येथे कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास सुरू आहे.

ही कामगिरी श्रीमती कल्पना बारवकर पोलीस अधीक्षक, नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांचे मार्गदर्शना खाली हिंगोली युनिटने केलेली असुन सदर गुन्हयाचा तपास श्री निलेश सुरडकर, पोलीस उपअधीक्षक, लाप्रवि. हिंगोली हे करीत आहे.

अँन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांच्या वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील, तर कृपया अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालयाशी संपर्क साधावा.

**टोल फ्री क.१०६४,**
दुरध्वनी क.०२४५६—२२३०५५,
मोबाईल कमांक :— ९८२२२००९५९